मराठी चित्रपट संवर्धनासाठी ऑस्कर अकादमीच्या सुविधा व योजना यांचा प्रभावी वापर करुन घेण्यासाठी राज्यस्तरावर समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७९/सां.का.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

शासन निर्णय :-

ऑस्कर अकादमीचे अध्यक्ष श्री.जॉन बेली यांनी दिनांक २५-२६ मे, २०१९ रोजी मुंबईस भेट दिली होती आणि महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराच्या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून हजेरी लावली होती. मराठी चित्रपट संवर्धनासाठी आणि सदर मराठी चित्रपट जगाच्या कानाकोपऱ्यात पसरावा यासाठी ऑस्कर अकादमीचे महत्व अनन्यसाधारण आहे. अकादमीच्या सुविधा व योजना यांचा प्रभावी वापर करुन घेण्यासाठी राज्यस्तरावर समिती स्थापन करण्याचा निर्णय या भेटीच्या दरम्यान घेण्यात आला होता. त्या निर्णयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे :-

१)	मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य	: अध्यक्ष
२)	प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य	: सदस्य
३)	श्री. उज्ज्वल निरगुडकर, अध्यक्ष एसएमपीटीई	: तज्ञ
४)	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या.	: सदस्य सचिव

२. या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील :-

१) ऑस्कर अकादमीचे विभागीय कार्यालय मुंबईत करण्यासाठी योजना व पाठपुरावा करणे.

२) चित्रपट इतिहासावर आधारित आंतरराष्ट्रीय संग्रहालय बांधण्याचे काम अकादमीतर्फे लॉस एंजलीस (अमेरिका) येथे चालू आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे प्रणेते दादासाहेब फाळके यांचा अर्धाकृती पुतळा या संग्रहालयात असावा हे अकादमीने मान्य केले आहे. या संबंधीची पुढील कार्यवाही करणे.

३) मराठी चित्रपटाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध व्हावे याकरिता अकादमीच्या सहाय्याने वेगवेगळ्या योजना हाती घेणे.

४) अकादमीच्या विविध शाखा व कार्यकारणीवर चित्रपट क्षेत्रातील दिग्दर्शक / तंत्रज्ञ / समीक्षक इत्यादीची नोंदणी होत असते. महाराष्ट्रामधून अशा पध्दतीने नियोजनबध्द अधिकाधिक नोंदणी करण्यासाठी आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९१७१५४१४६३७२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b98e926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.20 17:04:47 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी
४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई
९) श्री.उज्ज्वल निरगुडकर, अध्यक्ष, सोसायटी ऑफ मोशन पिक्चर्स अँड टेलिव्हिजन इंजिनियर्स, मुंबई
१०) उप सचिव, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय, मुंबई
११) संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१६) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावरील नवनियुक्त सर्व संचालक, द्वारा - दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई.
१७) निवड नस्ती - सां.का.१.